


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ७६ वा | बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ज्ञानेश कुमारांनी पारदर्शक निवडणुका संपवल्या

## मोदी हे आर्किटेक्ट तर अमित शाह इम्प्लिमेंटर, राहुल गांधींचा हल्लाबोल

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** लोकशाहीसाठी आम्ही सगळे एकत्र लढणार असल्याचे मत काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केले आहे. आज इंडीया आघाडीच्या प्रमुख नेत्यांची नवी दिल्लीत बैठक झाली.

यानंतर पत्रकार परिषद झाली. त्यावेळी राहुल गांधी बोलत होते. यावेळी राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावरही टीका केली. संविधानाचे रक्षण करणे हाच आमच्या आंदोलनाचा उद्देश असल्याचं गांधी म्हणाले.

**ज्ञानेश कुमारांनी पारदर्शक निवडणुका संपवल्या आहेत**

दरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावरही राहुल गांधी यांनी जोरदार टीका केली. ज्ञानेश कुमारांनी पारदर्शक निवडणुका संपवल्या आहेत असे गांधी म्हणाले. आमची टीम आता थांबणार नाही. मतचोरीचा मुद्दा राजकीय नाही तर सर्वसामान्य जनतेचा आहे असेही राहुल गांधी म्हणाले. भाजपविरोधात आम्ही सगळ्यांची एकजूट असल्याचे गांधी म्हणाले.

**मोदी हे आर्किटेक्ट आहेत, तर अमित शाह आणि ज्ञानेश कुमार इम्प्लिमेंटर**

आम्ही इथे सगळे एकत्र आहोत, उभं आहोत एक म्हणून आहोत. लोकशाही संपवली जात असल्याचे गांधी म्हणाले. जंतर मंतरवर आता लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्यास दिले जाणार नाही असा निर्णय घेण्यात आला आहे. मोदी हे आर्किटेक्ट आहेत,



तर अमित शाह आणि ज्ञानेश कुमार इम्प्लिमेंटर आहेत असे गांधी म्हणाले. तुम्ही लोकशाही संपवू शकत नाही. तुम्ही काल जे पाहिलं ते फक्त पक्षाचे नाही तर सर्वसामान्यच्या भावना होत्या. हे सगळं भारतीयांसाठी सुरु आहे, देशाच्या भविष्यासाठी करत असल्याचे राहुल गांधी म्हणाले.

**आम्ही सगळे मिळून लढत राहणार**

काल मी पत्रकार परिषद मध्ये बोललो आम्ही थांबणार नाही, आज नाही तर उद्या ही टीम एन्ड गोलपर्यंत जाणार आहे. सगळं आम्ही आता सांगणार नाही. तुम्हाला सरप्राईज केलं जाणार आहे. आम्ही सगळे मिळून लढत राहणार आहोत. आम्ही न्यायलाय सरन्यायधीश यांचा आदर करतो ते त्यांचा रोल प्ले करतील असेही राहुल गांधी म्हणाले. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात इंडीया आघाडीचे नवी दिल्लीत आंदोलन सुरु आहे. ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी केली जात आहे.

## ज्ञानेश कुमारांविरोधातील लढ्यात फूट पाडण्याचा डाव-अभिजीत दिपके

इंडिया आघाडी, कॉक्रोच जनता पार्टीच्यावतीने दिल्लीत आंदोलन करण्यात येत आहे. त्यामुळे मागील काही दिवसांपासून दिल्लीत मोठ्या प्रमाणात पोलिसांचा फौजफाटा तैनात असून तणावाचं वातावरण निर्माण झालेलं आहे.

या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर बोलताना सीजेपीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत एक मोठं वक्तव्य केलं आहे. इंडिया आघाडीच्या मोर्चावर अप्रत्यक्ष भाष्य करत केंद्र सरकार आपल्याला (इंडिया आघाडी आणि सीजेपी) एकमेकांविरोधात उभं करत आहे, असा आरोप अभिजीत दिपके यांनी केला आहे. पण आपण आपण एकजुटीने उभं राहायला हवं असंही दिपके यांनी म्हटलं आहे.

### अभिजीत दिपके काय म्हणाले?

'जेव्हा कॉक्रोच जनता पार्टीला आंदोलन करण्याची परवानगी मिळाली, तेव्हा अनेकांनी लगेच असे तर्क मांडले की आम्हाला भाजपानेच मुद्दाम तिथं पाठवलं होतं. 'इंडिया' आघाडीने काल एक मोठं आंदोलन केलं, पण १० ऑक्टोबरला आमच्या बाबतीत जशी कठोर कारवाई झाली, तसं इंडिया आघाडीबाबत काही घडलं नाही. केंद्र सरकार नेमकं याच पद्धतीने आपल्याला एकमेकांविरुद्ध उभं करतंय. वेगवेगळ्या आंदोलनांशी वेगवेगळ्या प्रकारे वागून देऊन ते अशा लोकांमध्ये संशय आणि अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, जे मुळात एकाच ध्येयासाठी लढत आहेत', असा आरोप अभिजीत दिपके यांनी केला. 'माझी सर्वांना एक विनंती आहे की, त्यांनी वापरलेल्या या युक्त्या आणि डावपेच ओळखा. आज ते एका आंदोलनाला परवानगी देऊ शकतात आणि दुसरं आंदोलन दडपू शकतात. उद्या ते या भूमिकांची अदलाबदलही करू शकतात. सत्तेत असलेल्यांना जाब विचारण्याऐवजी आपण एकमेकांवरच संशय घेत राहावं, हाच त्यामागचा उद्देश आहे', असंही अभिजीत दिपके यांनी म्हटलं आहे.

'कट-कारस्थानांच्या अशा चर्चांमुळे आपल्यात फूट पडू देऊ नका. जेव्हा आपण एकजुटीने उभं राहायला हवं, तेव्हा आपापसात भांडणात अडकू नका. हा लढा ज्ञानेश कुमार आणि त्यांना संरक्षण देणाऱ्यांविरुद्ध आहे, हे कधीही विसरू नका', असं अभिजीत दिपके यांनी इंडिया आघाडीला उद्देशून म्हटलं आहे.

## पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण संपन्न

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६ साठी २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार असून, २७ ऑक्टोबर रोजी पुणे येथे मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, इतर कर्मचारी, मायक्रो ऑब्झर्व्हर तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण आज रंगभवन येथे पार पडले.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या प्रशिक्षणात सकाळच्या सत्रात पदवीधर मतदारसंघासाठी, तर दुपारच्या सत्रात शिक्षक मतदारसंघासाठी प्रशिक्षण देण्यात



आले. पदवीधर मतदारसंघाच्या ११७ तर शिक्षक मतदारसंघाच्या ७६ मतदान केंद्रांवर नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

पदवीधर मतदारसंघासाठी उपजिल्हाधिकारी सदाशिव पडदुने, तर शिक्षक मतदारसंघासाठी उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे यांनी प्रशिक्षण दिले. प्रशिक्षणादरम्यान निवडणूक प्रक्रियेतील विविध बाबींची सविस्तर माहिती देण्यात आली. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणातील सूचना काळजीपूर्वक समजून घेऊन मतदान केंद्रावर त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. मतदान प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची अडचण, त्रुटी किंवा हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी, यावर प्रशिक्षणात भर देण्यात आला. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी लक्ष्मण कसेकर, निवडणूक तहसीलदार एस. विभुते, नायब तहसीलदार शेख आदी उपस्थित होते.

## आरोग्य केंद्रात मावा बनविण्याच्या अड्ड्यावर आयुक्त डॉ. ओंबासेंची 'मुंडे स्टाईल' धाड!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आरोग्य केंद्राची पाहणी करण्यासाठी गेलेल्या महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी चक्क आरोग्य केंद्राच्या परिसरात सुरू असलेला मावा बनविण्याचा कारखाना शोधून काढला! अनधिकृत कारखाना नजरेस पडताच आयुक्तांनी थेट पोलीस उपायुक्तांना फोन करून कारवाईचे आदेश दिले. तुकाराम मुंडे यांच्या धडाकेबाज कार्यशैलीची आठवण करून देणाऱ्या या कारवाईमुळे अनधिकृतांचे धाबे दणाणले आहेत.





प्रभाग क्रमांक ०८ मधील नगरसेवकांच्या विनंतीवरून महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी साखर पेठ येथील कै. यशोदाबाई सिद्रामप्पा दिड्डी आरोग्य केंद्राला भेट देऊन संपूर्ण इमारतीची पाहणी केली. यावेळी आरोग्य केंद्रातील आवश्यक दुरुस्ती, वैद्यकीय सुविधा आणि अपुऱ्या मनुष्यबळाबाबत आरोग्याधिकारी डॉ. राखी माने यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

सदर आरोग्य केंद्राची इमारत अत्यंत जुनी व जीर्ण झाली असून, यापूर्वी रुग्णांची तपासणी सुरू असतानाच स्लॅबचे काँक्रीट ढासळल्याची गंभीर घटना घडली होती. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी इमारतीची बारकाईने पाहणी केली.

आरोग्य केंद्राच्या विस्तीर्ण जागेचा अधिक चांगला उपयोग नागरिकांच्या आरोग्यसेवेसाठी कसा करता येईल, याबाबत आयुक्तांनी आरोग्याधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी आमदार विजय देशमुख यांच्या पुढाकारातून शेळगी येथे उभारण्यात आलेल्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या (UPHC) धर्तीवर साखर पेठ येथेही सुसज्ज आरोग्य केंद्र उभारता येऊ शकते, अशी बाब समोर आली. त्यानुसार नवीन वढळउ उभारणीचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना आयुक्तांनी डॉ. राखी माने यांना दिल्या.

**मागील बाजूस पाहणी अन आयुक्तांसमोर धक्कादायक प्रकार!**

आरोग्य केंद्राच्या पाठीमागील मोकळ्या जागेची पाहणी करण्यासाठी आयुक्त गेले असता तेथे मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले. एका ठिकाणी नवीन सायकल फिटिंगचा कारखाना सुरू असल्याचे दिसले. त्याच परिसरात जाळीच्या गेटमधून पाहणी केली असता चक्क मावा बनविण्याचा कारखाना सुरू असल्याचे आयुक्तांच्या निदर्शनास आले!

हा प्रकार पाहताच आयुक्त डॉ. ओंबासे यांनी क्षणाचाही विलंब न करता पोलीस उपायुक्त प्रीतम यालावलकर यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून संबंधित प्रकाराची माहिती दिली आणि तातडीने कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना केल्या.

आयुक्तांच्या सूचनेनंतर पोलीस यंत्रणा तत्काळ घटनास्थळी दाखल झाली. संबंधित ठिकाणाची पाहणी करून गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

दरम्यान, महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे अविनाश वाघमारे यांच्या पथकानेही घटनास्थळी पाहणी करून अतिक्रमणधारकांवर कारवाई तसेच साहित्य जप्त करण्याची प्रक्रिया सुरू केली.

### जिथे आरोग्य जपायचे, तिथेच आरोग्याशी खेळ!

नागरिकांना आरोग्यसेवा देण्यासाठी असलेल्या महापालिकेच्या आरोग्य केंद्राच्या परिसरातच मावा बनविण्याचा कारखाना सुरू असल्याचा प्रकार समोर आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. एकीकडे जीर्ण इमारतीतून नागरिकांना आरोग्यसेवा दिली जात असताना दुसरीकडे आरोग्य केंद्राच्या जागेवर अनधिकृत असे उद्योग सुरू असल्याचे पाहणीत उघड झाले.

आरोग्य केंद्राच्या पाहणीसाठी आलेले आयुक्त थेट कारवाईच्या भूमिकेत शिरल्याने 'मुंडे स्टाईल' प्रशासनाचा प्रत्यय सोलापूरकरांना आला. आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या या धडाकेबाज भूमिकेमुळे अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

या पाहणी दौऱ्यावेळी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, आरोग्याधिकारी डॉ. राखी माने, नगरसेवक अमर पुदाले, नगरसेवक प्रविण दगोर्पाटील, माजी नगरसेवक पांडुरंग दिड्डी, उपअभियंता अविनाश वाघमारे, विभागीय अधिकारी राघवेंद्र गायधनकर, कनिष्ठ अभियंता सलमान मणियार, जेलरोड पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार तसेच महापालिका प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आरोग्य केंद्राच्या विकासासाठी गेले अन अनधिकृत बंदी असलेल्या मावा कारखान्यावर कारवाईचा बडगा उगारला! आयुक्त डॉ. ओंबासेंच्या या अनपेक्षित धडक कारवाईची शहरात चर्चा रंगली आहे.

## आरोग्य विभागाच्या कारभारावर पारदर्शकतेचे उपचार कधी?

**अकलूज (विलास गायकवाड):-** अकलूज येथील संशयाच्या चक्रव्यूहात सापडलेल्या एका हॉस्पिटल विरुद्ध, केलेल्या तक्रारीवर अद्याप ठोस कारवाई झाली नसल्याने, आरोग्य विभाग राजकीय दबावाच्या ओज्याखाली सापडले आहे का? असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे. कारण एक महिन्यांचा दीर्घकाळ होऊनही, तक्रारदारास अद्याप काय कार्यवाही झाली, याचा अहवाल प्राप्त झाला नाही. म्हणून आरोग्य विभागाच्या कारभारावर पारदर्शकतेच्या उपचाराची गरज आहे का? असा संतप्त प्रश्न उपस्थित होत आहे.

जनआरोग्य योजनेतील रुग्णनोंदी आणि उपचारांची चौकशी कागदावरच? यामुळे रंगीत तालीम अथवा प्रयोग सादर कसा होणार?

तक्रार दाखल होऊन महिनाभर



उलटला; स्वतंत्र चौकशी आणि मेडिकल ऑडिटची मागणी आहे. परंतु आरोग्य विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, जिल्हा आरोग्य विभागाने याकडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. कारण रुग्णांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे तर योजनेतून शासनाची फसवणूक झाली आहे का? याची पडताळणी अत्यंत महत्त्वाची आहे. यामुळे राज्य शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत दाखल झालेल्या रुग्णांच्या नोंदी, त्यांना प्रत्यक्षात देण्यात आलेले उपचार आणि संबंधित रुग्णालयांकडून शासनाकडे सादर करण्यात आलेल्या उपचारांच्या दाव्यांची स्वतंत्र चौकशी करून मेडिकल ऑडिट करावे, अशी मागणी करणारी तक्रार तालुका आरोग्य विभागाकडे दाखल करण्यात आली आहे. मात्र, तक्रार दाखल होऊन तब्बल एक महिना उलटूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे तक्रारदाराच्या निदर्शनास आले नसल्याने आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

महात्मा फुले जनआरोग्य योजना ही सर्वसामान्य आणि गरजू रुग्णांना आर्थिक दिलासा देणारी महत्त्वाची आरोग्य योजना आहे. या योजनेअंतर्गत रुग्णांना प्रत्यक्षात कोणते उपचार देण्यात आले, उपचारांच्या नोंदी आणि उपलब्ध वैद्यकीय कागदपत्रे यांच्यात सुसंगती आहे का, तसेच शासनाकडे सादर करण्यात आलेले दावे नियमानुसार आहेत का, याची पडताळणी होणे आवश्यक आहे.

याच पार्श्वभूमीवर संबंधित प्रकरणाची स्वतंत्रपणे चौकशी करून रुग्णांच्या नोंदी, उपचारांची कागदपत्रे, वैद्यकीय अहवाल आणि शासनाकडे सादर करण्यात आलेल्या दाव्यांचे सखोल मेडिकल ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

मात्र, तक्रार दाखल करून एक महिना उलटूनही चौकशीबाबत कोणती ठोस माहिती मिळाली नसल्याचा तक्रारदाराचा आरोप आहे. सत्य परिस्थिती समोर आणण्यासाठी निष्पक्ष चौकशी आणि वैद्यकीय नोंदींचे परीक्षण होणे आवश्यक आहे.

आता आरोग्य विभाग काय भूमिका घेणार याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.




## ऊस दर प्रश्नासाठी पुणे - बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन सुरू

### कोल्हापुर, सांगलीत आंदोलन तापले

**कोल्हापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र सरकारसोबत झालेली चर्चा निष्फळ ठरल्यानंतर मंगळवारी महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील कोगनोळी टोल नाक्यावर ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले. माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनामुळे पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील



वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या २५ व्या ऊस परिषदेत ठरल्याप्रमाणे साखरेचा किमान विक्री हमी भाव प्रतिकिलो ५० रुपये करावा, सी-हेवी मोलॅसिसपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करावा आणि लवकर गळीत हंगाम सुरू होत असल्याने शेतकऱ्यांना प्रतिटन ५०० रुपये अनुदानसह प्रतिटन ५ हजार रुपये दर मिळावा या तीन प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे.

काल नवी दिल्ली येथे केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी आणि केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासोबत झालेल्या तीन तासांच्या बैठकीत कोणताही ठोस निर्णय न होता केवळ (पान 2 वर..)



## संपादकीय

# मतदानाआधीच मतदाराचा पराभव?

लोकशाहीत मतदाराचा पराभव मतदानाच्या दिवशीच होतो असे नाही; अनेकदा तो त्याआधीच होतो, जेव्हा त्याचे नाव मतदारयादीतून गायब होते. मतदानकेंद्रावर गेल्यानंतर ह्यतुमचे नाव यादीत नाही' हे ऐकताना त्याचे नागरिकत्व संपत नाही; पण प्रतिनिधी निवडण्याची त्याची संधी हिरावली जाते. संविधानाने दिलेल्या आश्वासनापर्यंत पोहोचण्याचा दरवाजाच बंद होतो. म्हणून मतदारयादीतील चूक म्हणजे लोकशाहीच्या पायातील भेग आहे.

मतदारयादीवरील वाद आपण तातडीने सत्ताधारी आणि विरोधक अशा परिचित चौकटीत बसवतो. एकाला कांगावा दिसतो, दुसऱ्याला कारस्थान. या संघर्षात ज्याचे नाव वगळले गेले, तो नागरिक कुठे आहे? त्याचे म्हणणे कोणी ऐकले? राजकीय पक्षांच्या हिशेबात मतदारांची संख्या मोजली जाते; त्या संख्येमागच्या माणसाचा हक्क मात्र अनेकदा दुर्लक्षित राहतो. यादी अचूक ठेवण्याच्या आवश्यकतेवर वाद असण्याचे कारण नाही. मृत व्यक्तींच्या नोंदी, दुबार नावे आणि अपात्र नोंदी दुरुस्त झाल्याच पाहिजेत. पण यादी स्वच्छ करण्याच्या नावाखाली पात्र नागरिक वगळला जात असेल, तर शुद्धीकरणाचे रूपांतर अधिकारकपातीत होते. संशयास्पद नोंद शोधणे आणि नागरिकाला अपात्र ठरवणे या वेगळ्या पायऱ्या आहेत. संशय हा चौकशीचा प्रारंभ असू शकतो; अंतिम निर्णयाचा पुरावा नव्हे.

म्हणून प्रश्न किती नावे काढली एवढाच नाही; ती कोणत्या निकषांवर, कोणत्या पुराव्याने आणि कोणाच्या अधिकारात काढली, हेही स्पष्ट झाले पाहिजे. मसुद्यातील वगळणी, अंतिम यादीतील वगळणी आणि दुरुस्तीनंतरची पुनर्स्थापना यांतील फरकही सांगितला पाहिजे. संदर्भाशिवाय मोठे आकडे मांडणे जसे दिशाभूल करणारे ठरते, तसेच आकड्यांच्या आड वैयक्तिक अन्याय लपवणेही अक्षम्य आहे. प्रशासनासाठी एखाद्या मतदाराचे यादीतील नाव ही संगणकातील एक ओळ असते; नागरिकासाठी तो स्वतःचे प्रतिनिधी निवडण्याचा मार्ग असतो. नाव वगळण्यापूर्वी त्याला प्रभावी सूचना मिळाली का? कारण समजले का? उत्तरासाठी पुरेसा वेळ होता का? चुकीचा निर्णय मतदानापूर्वी सुधारता येतो का? प्रक्रिया कागदावर पूर्ण झाली आणि नागरिकाचा हक्क प्रत्यक्षात हरवला, तर त्या प्रशासकीय कार्यक्षमतेचे कौतुक कशासाठी करायचे?

स्थलांतरित कामगार, भाडेकरू, विद्यार्थी, आदिवासी, वृद्ध आणि बेघर नागरिकांसाठी या प्रश्नांचे महत्त्व अधिक आहे. चौकशीच्या वेळी घरी न सापडणे म्हणजे व्यक्ती अस्तित्वातच नसणे नव्हे. कागदपत्रे तातडीने उपलब्ध नसणे म्हणजे अपात्रता सिद्ध होणेही नव्हे. पडताळणी काटेकोर असावी; मात्र नागरिकांच्या जगण्यातील अडचणींचे रूपांतर त्यांच्या विरोधातील पुराव्यात होता कामा नये. प्रत्येक टप्प्यासाठी स्पष्ट मुदत, जबाबदार अधिकारी आणि विलंबाचे स्पष्टीकरण असावे. निर्णयाची प्रत नागरिकाला मिळावी. हक्क नाकारण्याची यंत्रणा वेगवान आणि हक्क पुनर्स्थापित करण्याची यंत्रणा संथ, अशी विषमता लोकशाहीत मान्य करता येणार नाही.

या वादाच्या केंद्रस्थानी निवडणूक आयोगाची निर्णयप्रक्रियाही आहे. मुख्य निवडणूक आयुक्त हा आयोगाचा प्रमुख चेहरा असला, तरी आयोग म्हणजे एक व्यक्ती नाही. इतर आयुक्त केवळ सहाय्यक अधिकारी नाहीत. बहुसदस्यीय रचनेचा अर्थ स्वतंत्र विचार, सामूहिक चर्चा आणि निर्णयातील सहभाग असा आहे. शक्यतो एकमत आणि मतभेद झाल्यास बहुमत, हे तत्त्व प्रत्यक्ष व्यवहारात दिसले पाहिजे. त्यामुळे मुख्य आयुक्तांवर सर्व आरोप केंद्रित करणे जितके अपुरे, तितकेच सामूहिकतेच्या आड वैयक्तिक जबाबदारी लपवणेही अयोग्य आहे. इतर आयुक्तांनी लेखी आक्षेप नोंदवले असतील, तर 'ते गप्प का बसले?' हा प्रश्न अपुरा ठरतो. त्यांच्या आक्षेपांवर काय झाले, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. चर्चा झाली का? निर्णय बदलला का? आक्षेप फेटाळला असल्यास कारण काय? सर्व निर्णय एकमताने झाल्याचा दावा असेल, तर त्या एकमतापर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया नोंदींतून स्पष्ट झाली पाहिजे.

मतभेद असणे म्हणजे मनमानी सिद्ध होणे नव्हे; पण एकमताचे निवेदन म्हणजे सर्व प्रश्नांचे निराकरणही नव्हे. प्रत्येक अंतर्गत संभाषण सार्वजनिक करण्याची गरज नसते. मात्र मतदानाच्या हक्कावर परिणाम करणाऱ्या निर्णयांची कारणे, अधिकृत मान्यता आणि आक्षेपांवरील निर्णय उपलब्ध असले पाहिजेत. 'आमच्यावर विश्वास ठेवा' याला बळ मिळते ते ह्यही आमची पडताळता येणारी प्रक्रिया' असे दाखवल्यावरच. संस्थेतील मतभेद ही लाजेची बाब नाही. ते ऐकण्याची आणि सोडवण्याची व्यवस्था नसणे ही चिंतेची बाब आहे.

हे तत्त्व निवडणूक आयोगापुरते मर्यादित नाही. तपास यंत्रणा, करप्रशासन किंवा लेखापरीक्षण करणाऱ्या संस्थांनाही ते लागू होते. संस्थांची विश्वासार्हता कमी करण्याचा कट असल्याचे म्हणणे सोपे आहे; त्यासाठीही पुरावा लागतो. माहिती नाकारणे, आक्षेप अनुत्तरित ठेवणे आणि टीकाकारांच्या हेतूंवरच प्रश्न उपस्थित करणे सुरू असेल, तर अविश्वासाची संपूर्ण जबाबदारी बाहेरच्या कारस्थानांवर ढकलता येणार नाही. संस्थांना प्रश्न विचारणे आणि त्यांची विश्वासार्हता खच्ची करणे यांतील भेद स्पष्ट हवा. विशिष्ट त्रुटी दाखवून दुरुस्ती मागणे संस्थेला बळ देते. पुराव्याशिवाय संपूर्ण प्रक्रिया बनावट ठरवणे संशय वाढवते. त्याच वेळी प्रत्येक टीकेला संस्थेविरोधातील हल्ला म्हणणे उत्तरदायित्व नाकारते. संस्थेची प्रतिष्ठा प्रश्नांपासून संरक्षण देणारी ढाल नसावी; प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्याची क्षमता असावी. आरोप करणाऱ्यांनीही तपशील द्यावेत. घोषणा म्हणजे पुरावा नाही. मात्र आवश्यक माहिती संस्थेच्याच ताब्यात असेल, तर ती न देता पुरावे मागत राहणेही प्रामाणिकपणाचे नाही. माहिती उपलब्ध करणे, आरोप तपासणे आणि निष्कर्ष स्पष्ट करणे या परस्परपूरक जबाबदाऱ्या आहेत. सत्तेला वैधता देणाऱ्या प्रक्रियेची पारदर्शकता वाढवण्यात त्यांचा पुढाकार हवा. विरोधकांनीही पराभवानंतरच जागे होऊन चालणार नाही. नोंदणीपासून अंतिम यादीपर्यंत सातत्याने सहभाग, त्रुटींची नोंद आणि नागरिकांना प्रत्यक्ष मदत हे त्यांचे काम आहे. मतदाराच्या हक्काचा प्रश्न केवळ राजकीय आंदोलनासाठी राखून ठेवता येत नाही.

विजय मिळाला की व्यवस्था निर्दोष आणि पराभव झाला की व्यवस्था भ्रष्ट, हा निकष लोकशाहीला परवडणार नाही. निवडणुकीची शुचिता प्रत्येक पक्षाच्या सोयीनुसार बदलू लागली, तर सार्वजनिक विश्वास टिकणार कसा? निष्पक्षतेची मागणी करताना स्वतःच्या भूमिकेतही सातत्य दाखवावे लागते. प्रत्येक प्रश्न रस्त्यावर नेण्याच्या प्रवृत्तीचाही विचार आवश्यक आहे. चुका आपोआप दुरुस्त होत नाहीत. आंदोलनातून नेमकी मागणी, ठोस पुरावा आणि व्यवहार्य उपाय पुढे येत आहेत का, की संघर्ष टिकवण्यासाठी संशय जिवंत ठेवला जात आहे, हे तपासले पाहिजे.

उपाय म्हणून आश्वासनांपलीकडे जाणारे सार्वजनिक ऑडिट हवे. किती नावे जोडली, वगळली आणि पुनर्स्थापित झाली, किती हरकती आल्या आणि किती मान्य झाल्या, याची तुलनायोग्य आकडेवारी उपलब्ध व्हावी. स्वतंत्र नमुना तपासणीतून त्रुटींचे प्रमाण आणि विशिष्ट भागांवरील परिणाम तपासले जावेत. निष्कर्षांबरोबर सुधारात्मक कारवाईही जाहीर व्हावी. काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र म्हणजे गुणवत्तेची खात्री नव्हे.

डिजिटल व्यवस्थेत प्रत्येक बदल कोणी, कधी, कोणत्या कारणाने आणि कोणाच्या अधिकाराने केला, याची सुरक्षित नोंद राहावी. स्वतंत्र तांत्रिक परीक्षणातून अनधिकृत हस्तक्षेप शोधता यावा. नागरिकाला स्वतःची नोंद, बदलाची सूचना आणि तक्रारीची स्थिती सहज तपासता यावी. राजकीय पक्षांच्या अधिकृत प्रतिनिधींना समान निकषांवर आवश्यक माहिती मिळावी. तंत्रज्ञानाने पडताळणी सुलभ करावी; निर्णयप्रक्रिया अधिक गूढ बनवू नये. मतदारयादीतील प्रत्येक नावामागे स्वतंत्र माणूस आहे; कोणत्याही पक्षाची मालमत्ता नाही. त्याचा अधिकार सत्तेच्या सोयीवर अवलंबून नसल्याची खात्री त्याला मिळाली पाहिजे. वृद्ध महिलेला, स्थलांतरित कामगाराला आणि प्रथमच मतदान करणाऱ्या तरुणाला प्रक्रिया सारखीच न्याय्य वाटली पाहिजे. निवडणूक आयोगाने नागरिकांच्या मताधिकाराचा विश्वस्त म्हणून ही खात्री द्यावी. विश्वास आदेशातून नाही, पडताळता येणाऱ्या न्यायातून निर्माण होतो. निवडणुकीत हरलेला पक्ष पुन्हा जिंकू शकतो; मतदानाची गमावलेली संधी नागरिकाला मागाहून परत देता येत नाही. म्हणून चुका सुधारण्याची वेळ निकालानंतरची नसते. विजेत्याला सत्ता मिळण्याइतकेच पराभूताला प्रक्रिया न्याय्य वाटणे महत्त्वाचे आहे. लोकशाही ला दोन्हींची गरज असते. निवडणूक हरली म्हणून लोकशाही संपत नाही. पण निवडणुकीवरचा विश्वास हरवला, तर लोकशाहीचा पाया हादरतो.

# एकट्या ज्ञानेश कुमारला वाचविण्यासाठी सरकार कासावीस का?

# दिल्लीत अघोषित बंदी कशासाठी? ही कसली लोकशाही!

सरकारची किती मनमानी सुरू आहे ही बाब सुप्रीम कोर्टाच्या हंटरवरून लक्षात येते सुप्रीम कोर्टाने सरकारला सुनावले की बॅरिकेड्स हटवा, इंटरनेट सुरू करा. याव्यतीक्त केंद्रीय गृहसचिव,दिल्ली पोलिसांना सुद्धा नोटीस बजावली यामध्ये आंदोलना दरम्यान वाहतूक सेवावरील निर्बंध संदर्भातील आपल्या आधीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी सुप्रीम कोर्टाने अवमान कारवाई करण्याप्रकरणी केंद्रीय गृहसचिव, दिल्ली पोलीस आयुक्त आणि दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन यांनाही नोटीस बजावली आहे.सुप्रीम कोर्टाने यांना नोटीस बजावली याचे स्वागत आहे.परंतु बॅरिकेड्स, इंटरनेट सेवा बंद करने, एकट्या ज्ञानेश कुमारसाठी ३८ हजार जवानांचा पहारा, दिल्लीकडे येणाऱ्या ट्रेन रद्द,५७ मेट्रो स्टेशन बंद हे आदेश तेथील प्रशासनाला आणि आयुक्तांना किंवा अधिकाऱ्यांना कोणी दिले त्या राजकीय पुढाऱ्यांवर किंवा मंत्र्यांवर सुप्रीम कोर्टाने कठोर कारवाई करावी अशी माझी विनंती आहे. कारण जेन-झीचे किंवा सर्वसामान्यांच्या किंवा विरोधी पक्षाच्या तक्रारी न ऐकता बळाचा वापर करून हुकूमशाही सारख्या पद्धतीने कारवाई करणे म्हणजे देश विरोधी कारवाई म्हणावी लागेल. कारण आंदोलन करते देशाचे नागरिक व युवा आहेत त्यांच्या समस्यांचा यत्किंचितही विचार न करता एकट्या ज्ञानेश कुमारसाठी बळाचा वापर करून देशाचे करोडों रूपयांचे सुरक्षेसाठी खर्च करणे ही हुकूमशाहीची नांदीच म्हणावी लागेल.गेल्या तीन-चार दिवसांच्या घटनेमुळे देशाची बदनामी होत आहे ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे आणि हेही लक्षात ठेवले पाहिजे की, एकटा ज्ञानेश कुमार म्हणजे देश नाही किंवा सरकार नाही त्यामुळे देशाची परिस्थिती खराब करणाऱ्या ज्ञानेश कुमार यांच्यावर सुप्रीम कोर्टाने कठोर कारवाई करावी. आज अर्धा देश कोरड्या दुष्काळाशी झुंज देत आहे यावर्षी पाऊस कमी झाल्याने देशात पाणी टंचाईचा गंभीर प्रश्न उपस्थित आहे आणि सरकार एकट्या ज्ञानेश कुमार यांना वाचवण्यासाठी ऐडीचोटीचे प्रयत्न करीत असून देशाची सुरक्षा यंत्रणा व संपूर्ण वाहतूक यंत्रणा ठप्प करून देशाचे करोडों रुपए पाण्यासारखे उडवत आहेत व देशाला आर्थिक अडचणीत टाकत आहे ही कसली सरकार व लोकशाही म्हणावी! सरकारने गोरगरीब, शेतकरी-शेतमजूर, बेरोजगार, सर्वसामान्य यांना मदत करण्याचे सोडून संपूर्ण ताकद सरकारने ज्ञानेश कुमार यांना वाचवण्यासाठी खर्च करीत आहे याची सरकारला लाज वाटायला पाहिजे.आज विरोधी पक्षाचे लोकसभा व राज्यसभा मिळून ३०० खासदार ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात उभे ठाकले असून राजीनाम्याची मागणी करीत आहेत तरीही सरकारच्या नाकावरील माशी उडायला तयार नाही हा अत्यंत गंभीर व चिंतेचा विषय आहे. सरकारला सुप्रीम कोर्टाने हंटर मारला तरीही पोलिसांकडून कडक बंदोबस्त व धरपकड सुरूच आहे परंतु आता युवा पिढी सरकारच्या दमनशाहीला घाबरणार नसल्याचे दिसून येते. कारण सध्या देशात आणीबाणी सारखी गंभीर परिस्थिती सरकारने निर्माण केली आहे.यामागचा सरकारचा एकच उद्देश असावा की, देशातील १४५ कोटी जनतेच्या मुलभूत गरजा, महागाई, बेरोजगारी, पेपर फुटी, एमपीएससी पेपर फुटी, महागडे शिक्षण, कोरडा दुष्काळ, शेतकरी-शेतमजुराच्या आत्महत्या यावर पडदा टाकण्यासाठी ज्ञानेश कुमारला बाहूले बनवून वापर करून देशाच्या १४५ कोटी जनतेची दिशाभूल करीत असल्याचे स्पष्ट दिसून येते.परंतू आता" जेन-झी रूकेगा नही साला" अशा कठोर भुमिकेत दिसतो.सरकारला सुप्रीम कोर्टाचा हंटर पडूनही डगमगतांना दिसत नाही याचा अर्थ असा की सरकार लोकशाहीची पायमल्ली करीत आहे की काय असे चित्र स्पष्ट दिसत आहे. दिल्लीतील जंतर मंतरवर कॉक्रोच जनता पार्टीच्या (सीकेपी) आंदोलनाआधी झालेल्या सरकारच्या कारवाईचा आणि पोलीस बळाच्या वापराबाबत सुप्रीम कोर्टाने सरकारची चांगलीच कानउघाडणी केली.तरीही सरकार बेशरमासारखी कठोर आणि निष्ठुर असल्याचे दिसून येते.मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी कॉक्रोच जनता पार्टीने १० ऑक्टोबरच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारला मोठा धसका बसला यामुळे दिल्लीत अभुतपुर्व बंदोबस्त करण्यात आला. सीजेपीच्या आंदोलनाला घाबरून सरकारने ३८ हजार सुरक्षा सैनिकांची तुकडी राजधानीत आणली, तसेच ५७ मेट्रो स्टेशन बंद केले व दिल्लीकडे देशभरातून येणाऱ्या मेल,एक्सप्रेस गाड्या दोन दिवस रद्द केल्या हा सर्व प्रकार ज्ञानेश कुमार यांना वाचवण्यासाठी सरकार करीत असल्याचे जनतेच्या लक्षात आले आहे. ज्ञानेश कुमारच्या कारणाम्यावरून लक्षात येते की सरकारला एसआयआर व निवडणूकी संदर्भात मोठी मदत केली असावी आणि त्यांमुळेच सरकार ज्ञानेश कुमारला वाचविण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत असावेत. सरकारच्या धोरणावरून स्पष्ट होते की "हम करे सो कायदा" परंतु हि ताणाशाही जास्त दिवस चालू शकत नाही. सरकार लोकप्रतिनिधी व पक्ष फोडून राज्य करीत आहे आणि हे संपूर्ण काम सरकार मुख्य निवडणूक आयुक्तांच्या मार्फत करीत आहेत आणि आता एसआयआर प्रक्रिये मार्फत देशातील विशिष्ट लोकांचे किंवा धमार्चे किंवा जातीचे करोडोंच्या संख्येने मतदार यादीतून नाव कमी करण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.आश्चर्याची बाब म्हणजे सरकारला दुसऱ्या पक्षातील भ्रष्टाचारी नेते चालतात आणि पक्ष प्रवेश केला की, भ्रष्टाचार मुक्त होतात ह्या संपूर्ण प्रक्रिया सरकार मुख्य निवडणूक आयुक्तांच्या मार्फत करून घेत आहेत.त्यामुळेच सरकार ज्ञानेश कुमारच्या पाठीशी असल्याचे दिसून येते.आज सीजेपीने ज्ञानेश कुमार यांच्या विरुद्ध आंदोलन पुकारले यावर सरकारने ताबडतोब एक्शन घेऊन ज्ञानेश कुमार यांना हटविले असते किंवा सीजेपीसोबत चर्चा केली असती तर हजारोंच्या संख्येने सुरक्षा सैनिकांची गरज दिल्लीमध्ये पडली नसती व मेट्रो स्टेशन बंद, ट्रेन रद्द, बसेस रद्द याची सरकारला गरजही भासली नसती.परंतु सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे आणि हेकेखोरीमुळे दिल्लीत येणाऱ्या व जाणाऱ्या लाखो ते करोडो प्रवाशांचे व स्थानिक लोकांचे काय हालबेहा झाले व होत आहे याचा सरकारने कदापि विचार केला नाही ही बाब सरकारच्या घृणास्पद कारवाई वरून लक्षात येते.सरकारच्या या चुकीच्या धोरणामुळे गेल्या तीन दिवसांत देशाचे व दिल्लीतील नागरिकांचे व व्यापाऱ्यांचे करोडोंचे नुकसान झाले व मानसिक त्रास सुध्दा झाला.यावर सरकार चुप्पी साधल्याचे दिसून येते.सध्या देशात लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी आहेत.याचा अर्थ असा नाही की, हुकूमशाही पद्धतीने कार्य करणे.ही लोकशाही आहे लोकांचे म्हणणे सरकारला ऐकावेच लागेल.सरकार आपल्या बहुमताच्या जोरावर बळाचा वापर करीत असेल तर ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल. भारतात लोकशाही पध्दतीने शांततेत आंदोलन करण्याची परंपरा आहे आणि संविधानाने त्याचा अधिकार सुध्दा सर्वांना दिला आहे त्याच पद्धतीने ज्ञानेश कुमार यांच्या चुकीच्या धोरणाविरोधात देशभरात सर्वत्र शांततेने आंदोलन सुरू आहे.परंतु हे आंदोलन दडपण्यासाठी व ज्ञानेश कुमार यांना वाचवण्यासाठी सरकार वाटेल ते प्रयत्न करून देशाचे करोडो ते अरबो रूपयांचा चुराडा सरकार कडून होतांना दीसते. १९४७ ला देश स्वतंत्र झाला.त्यानंतर देशात ज्यांची-ज्यांची सरकार आली त्यांनी-त्यांनी देशाला व देशातील जनतेला कुठलाही धक्का न लागता ज्या-ज्या ठिकाणी चुका झाल्या त्या पार्श्वभूमीवर आपापल्या चुका त्यावेळच्या मंत्र्यांनी व अधिकाऱ्यांनी स्विकारल्या व आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत. यात मग कोणाचीही सरकार असो. साध्या रेल्वे दुर्घटना झाल्या त्यासाठी सुध्दा नैतिक जबाबदारी स्वीकारून अनेक मान्यवरांनी आपापल्या पदाचे राजीनामे दिले आहेत हा स्वतंत्र भारताचा इतिहास आहे.परंतू आतातर देशात जनुकाय ताणाशाही आली की काय असे चित्र दिसत आहे.देशात २०१४ पासून भाजपाचे सरकार आहे त्यांचे आतापर्यंत कार्य सुरळीत होते यात दुमत नाही.परंतु ज्या-ज्या ठिकाणी सत्ताधारी राजकीय पुढाऱ्यांनी चुका केल्या त्यांना नेहमी सरकारने झाकून ठेवले व त्यांना पाठीशी घालुन देशात गंभीर परिस्थिती निर्माण केली.त्याचप्रमाणे केंद्र सरकार व भाजपा शासित राज्य सरकारांनी लोकप्रतिनिधींना फोडा आणि राज्य करा अशी रणनीती आखली आहे.ज्याप्रमाणे इंग्रजांनी "तोडा फोडा राज करा"ही पध्दत अंगीकारली होती;तीच पद्धत देशात सध्या सुरू आहे व तशाच पध्दतीने फोडाफोडीचे राजकारण करून व इडी किंवा अन्य सरकारी एजंसीच्या मार्फत दबाव टाकून सरकारचा विरोध करणाऱ्यांवर कारवाई होत आहे व देशात राज्यकर्ते राज्य करतांना दिसतात.यामुळे सरकारची सहानुभूती,आपलेसेपणा,सत्यता हा सर्व प्रकार संपुष्टात आल्याचे दिसून येते.ज्ञानेश कुमार यांच्या कारकिर्दीत निवडणूकांमध्ये घोळ झाल्याचा आरोप आहेत आणि त्यांच्यावर असलेले आरोप उघड आहेत कारण यासाठी देश रस्त्यावर उतरला आहे.तीन निवडणूक आयुक्त असताना दोन आयुक्तांना विश्वासात न घेता ज्ञानेश कुमार स्वतःच निर्णय घ्यायचे व सरकार म्हणेल त्या पध्दतीने कार्य करायचे ह्या संपूर्ण बाबी उघडकीस आल्या तरीही सरकार ज्ञानेश कुमारला वाचविण्यासाठी मोठ्या प्रमाणात सरकारी यंत्रणेचा व दबाव तंत्राचा वापर करून ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात सुरू असलेले आंदोलन दडपण्यासाठी सरकार ऐडीचोटीचे प्रयत्न करीत आहे ही लोकशाहीची प्रतिमा मलीन करण्याची पध्दत दिसून येते. देशात अनेक घोटाळे, पक्ष फुटी, आमदार-खासदार फुटी, घोटाळे, घोडेबाजार, भ्रष्टाचार याबद्दल अनेकदा सुप्रीम कोर्टात आवाज उठवणारे जेष्ठ वकील कपिल सिब्बल सुध्दा हताश झाल्याचे दिसून येते.ते म्हणतात की, मी सर्वोच्च न्यायालयात जाऊन आता थकलोय मला फारशा अपेक्षा राहिलेल्या नाहीत; अशाप्रकारे जेष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी न्यायव्यवस्थेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. यावरून स्पष्ट होते की, सरकारची मनमानी सुरू आहे.या आंदोलनादरम्यान लाठीचार्ज, धरपकड अनेक स्वंतत्र पत्रकारांवर कारवाई ही लोकशाहीला काळीमा फासणारी बाब म्हणावी लागेल. सरकार असो अथवा निवडणूक आयुक्त असो किंवा अन्य मंत्री किंवा अधिकारी असो प्रत्येकांनी जनतेच्या प्रश्नांना उत्तरं दिलेच पाहिजे त्यालाच खरी लोकशाही म्हणता येईल.

जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# केस काढून घे म्हणून खून केल्याप्रकरणी बाप लेकांची निर्दोष मुक्तता- ॲड. मिलिंद थोबडे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मौजे सलगर, ता. अक्कलकोट येथील भिमाशंकर श्रीकांत पोलासे याचा खून केल्याप्रकरणी अटकेत असलेले उमेश मलप्पा पोलासे, उ.व.३२. सुरेश मलप्पा पोलासे, उ.व.३५ यांचेसह मलप्पा गणपती पोलासे उ.व.७८ सर्व रा. सलगर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

यात हकीकत अशी की, आरोपीची शेतजमीन मयत भिमाशंकर श्रीकांत पोलासे यांचे शेतालगत होती व त्यांचेमध्ये वहिवाटीच्या कारणावरून वाद विवाद होते. त्यानंतर दि.०२/०३/२०२१ रोजी शेतीच्या वादातून आरोपींनी कुन्हाड व फावड्याने मारहाण करून मयत मिमाशंकरचे वडील श्रीकांत व भाऊ धोंडप्पा यांना मारहाण केली व त्यानंतर टाटा सुमो वाहन अंगावर घालून मयत भिमाशंकरचा खून करण्याचा प्रयत्न केला होता. त्याअनुषंगाने श्रीकांत पोलासे यांनी आरोपीविरुध्द अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंद केला होता. त्यानंतर वेळोवेळी आरोपी मयत भिमाशंकर व त्यांच्या कुटूंबियांना केलेली केस काढून घे म्हणून सतत धमक्या देत होते. दि.०६/०५/२०२४ रोजी मयत मिमाशंकर व त्याचा भाऊ धोंडप्पा शेतीकामासाठी शेतामध्ये गेले व सकाळी ८.३५ वा. च्या सुमारास धोंडप्पा दुसऱ्या शेतात काम करीत



असताना, त्यास मयत भिमाशंकरचा ओरडण्याचा आवाज दुसऱ्या शेतातून आल्याने त्याने सदरबाब त्याचे वडील श्रीकांत पोलासे यांना फोन करून सांगितले व त्यानंतर श्रीकांत व धोंडप्पा भिमाशंकर असलेल्या शेताकडे जात असताना, हणमंत पाटीलच्या शेताजवळ पाणंद रस्त्यावर उमेश, सुरेश व मलप्पा हे भिमाशंकर यास दगडाने व लोखंडी पाईपने गारहाण करत असताना दिसल्याने ते ओरडल्याने आरोपी तेथून पळून गेले. त्यानंतर भिमाशंकर यास जखमी अवस्थेत दवाखान्यात आणले असता तो मयत झाल्याचे डॉक्टरांनी कळविले. त्यामुळे पूर्वी केलेली केस काढून घेण्याच्या कारणावरून आरोपींनी भिमाशंकरचा खून केल्याची फिर्याद श्रीकांत पोलासे यांनी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात दाखल केली होती.

सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस अधिकारी निलेश बागाव यांनी करून गे. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

खटल्याच्या सुनावणीवेळी सरकारपक्षातर्फे २ प्रत्यक्षदर्शी नेत्र साक्षीदारासह एकूण ११ साक्षीदार तपासण्यात आले.

खटल्याच्या अंतीम युक्तीवादावेळी ॲड. मिलिंद थोबडे यांनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष विश्वासार्ह नसून त्यांच्या कृतीवरून त्यांनी घटना प्रत्यक्ष पाहिल्याचा बनाव केल्याचे दिसून येत असल्याचे सांगून पूर्वी दाखल असलेल्या प्राणघातक हल्याच्या केसमध्ये खटला घटनेपूर्वीपासून निकालाकरीता न्यायप्रविष्ठ होता, त्यामुळे केस मागे घे असे म्हणण्याचा व त्यामुळे खून करण्याचा कोणताही प्रश्न उदभवत नसल्याचे सांगितले व नेत्र साक्षीदारांनी त्यांच्या उलटतपासणीमध्ये दिलेल्या कबूली जबाबावरून त्यांची साक्ष अविश्वसनीय व असंभवनिय वाटते.

वैद्यकीय अधिकारी यांच्या साक्षीमधील मयत भिमाशंकर यास झालेल्या जखमा अपघाताने होवू शकतात अशी घेतलेली कबूली निदर्शनास आणून देवून अपघाती मृत्युचा गैरफायदा घेवून खोटी तक्रार केल्याचे निदर्शनास आणून दिले व त्यापुष्ठयर्थ न्यायनिवाडे सादर केले ते ग्राहय धरून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री. मनोज एस. शर्मा यांनी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

यात आरोपीतर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. राजकुमार मात्रे यांनी तर सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील प्रदिपसिंग राजपूत यांनी काम पाहिले.

# महिला सुरक्षा रक्षक पदासाठी वीर नारी, माजी सैनिकांना संधी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या., क्षेत्रीय कार्यालय, सोलापूर यांच्या माध्यमातून श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे महिला सुरक्षा रक्षकांची ६ पदे तातडीने भरण्यात येणार आहेत.

या पदांसाठी सोलापूर जिल्ह्यातील वीर नारी, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी, माजी सैनिकांच्या पत्नी, माजी सैनिक पाल्य तसेच माजी सैनिक आश्रित यांना संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या संधीचा इच्छुकांनी लाभ घ्यावा व आपली नावे तात्काळ जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे नोंदवावीत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, मेजर मिलिंद तुंगार सोलापूर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

या पदांबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांच्या ०२१७-२९९२३३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# महापौर कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन विभागाची आढावा बैठक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील सार्वजनिक परिवहन व्यवस्था अधिक सक्षम व प्रवाशांसाठी सोयीस्कर करण्याच्या दृष्टीने महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली आज सोलापूर महानगरपालिकेत परिवहन विभागाची आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी ई-बस चार्जिंग स्टेशन, बुधवार पेठ येथील ई-बस डेपो, बस थांब्यांची उभारणी यासह विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच सोलापूर शहरातील राजेंद्र चौक बस डेपो सात रस्ता बस डेपो या ठिकाणी अजून चार्जिंग स्टेशन उभे करण्यात येतील का या संदर्भातील चर्चा करण्यात आली.



या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरीताई देवकर, सभागृह नेते नरेंद्रजी काळे, स्थायी समिती सभापती रंजिताताई चाकोते, आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, नगरसेवक गौतम कसबे, परिवहन विभागाच्या नियंत्रण अधिकारी सारिका अक्कलवार, कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, नगर अभियंता नीलकंठ मठपती आणि अग्निशामक विभागाचे प्रमुख राकेश साळुंखे, जेबीएम कंपनीचे प्रदीप उंबरकर, ध्रुव, परिवहन व्यवस्थापक इराण्णा वन्यालोल्लू, व्कनिष्ठअभियंता यंकटेश गुडसेलू उपस्थित होते.

बैठकीत जेबीएम कंपनीमार्फत ई-बस चार्जिंग स्टेशनची उभारणी तातडीने सुरू करण्याबाबत चर्चा करण्यात आली. कंपनीकडून पाच चार्जर उपलब्ध करून देण्यात आले असून, चार्जिंग स्टेशनचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला. बुधवार पेठ ई-बस डेपोतील प्रलंबित सिव्हिल कामे सुरू करण्यासाठी लेबर मक्ता निश्चित करून येत्या ८-१० दिवसात कंपाउंड वॉल चे काम पूर्ण करण्यास आदेशित केले आणि काम सुरळीतपणे पूर्ण करण्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून घेण्याबाबतही चर्चा झाली.

शहरातील ई-बस सेवा अधिक कार्यक्षम करण्यासाठी पायाभूत सुविधांची कामे, बस थांब्यांचे नूतनीकरण आणि तिकीट प्रणालीचे आधुनिकीकरण याबाबत संबंधित विभागांनी समन्वयाने पुढील कार्यवाही करण्याच्या दृष्टीने बैठकीत चर्चा करण्यात आली. तसेच दिवाळीच्या अगोदर बसेस शहरात सुरू करण्यात येईल.

पान १ वरून

# ऊस दर प्रश्नासाठी पुणे - बेंगळुरू...

एका आठवड्यात समिती स्थापन करून निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. बैठक निष्फळ ठरल्यानंतर आज कोगनोळी टोल नाक्यावर हजारो शेतकरी दाखल झाले. यावेळी राजू शेट्टी यांनी केंद्र सरकार लेखी निर्णय जाहीर करत नाही तोपर्यंत महामार्ग एक इंचही मोकळा केला जाणार नाही, १५ नोव्हेंबरपूर्वी एकही साखर कारखाना सुरू करू देणार नाही. तातडीने तोडगा न काढल्यास कारखान्यातून बाहेर पडणारी साखरही अडवण्याचा, आंदोलन उग्र करण्याचा इशारा दिला आहे.

**रस्त्यावरच पंगती**

आंदोलन बेमुदत चालणार असल्याने महामार्गावरच अन्नछत्र आणि जेवणाच्या पंगतींची तयारी करण्यात आली आहे. कागल, निपाणी तालुक्यातील गावांमधून भाकरी-पिठलं गोळा करून तिथेच मुक्काम ठोकण्याची तयारी करण्यात आली आहे. आंदोलक शेतकऱ्यांनी महामार्गावरच पंगत टाकून जेवण केले.

**आंदोलन पसरले**

कोगनोळी सोबतच हत्तरगी, कराड, सातारा, इंदापूर आणि कर्नाटकातील हुबळी, गदग परिसरातही महामार्ग रोखण्यात आले आहे.. पोलिस प्रशासनाने वाहतूक पयार्यी मार्गाने वळवली आहे. पलूस तालुक्यात शंभरावर उसाची वाहने अडवण्यात आल्याचे सांगण्यात आले. भर उन्हातील आंदोलनात शेतकऱ्यांचा मोठा सहभाग असल्याने मोठ्या छावणीचे स्वरूप आले आहे.

**ऊस, काका अन बाप!**

राज्य साखर संघाचे माजी अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी साखर कारखाने अडचणीत असल्याचा संदर्भ देत राजू शेट्टीं यांना उद्देशून पहिली उचल ५ हजार रुपये द्यायला तुमच्या काकाने ठेवलेत का, अशा शब्दांत फटकारले. त्यावर राजू शेट्टी यांनी, उसाचा दर जाहीर न करता ऊस तोडायला ती काय तुमच्या बापाची पेंड आहे का, असा संतप्त पलटवार केला.

## वात्रटिका

### व्वा रे तत्वनिष्ठ

निष्ठेच्या पायावर कधीच
यांचे तत्वं उभे नसते...
पवित्रा असा असतो की
निष्ठावंत फक्त हेच, भासते...
बाह्या सरसावून आधी
निवडणूकीत उतरले...
कोणी दमदाटीने तर कोण
आमिषाने माघारी फिरले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# युटोपियन शुगर्सचे बॉयलर अग्निप्रदीपन व मोळी पुजन उत्साहात संपन्न




**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** कचरेवाडी ता.मंगळवेढा येथील युटोपियन शुगर्स लि. या कारखान्याच्या 2026-2027 या तेराव्या गळीत हंगामाचे बॉयलर अग्निप्रदीपन व मोळी पुजन समारंभ मंगळवार दि.13/10/2026 रोजी कारखान्याचे संस्थापक चेअरमन उमेश परिचारक व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक यांच्या शुभहस्ते उत्साही वातावरणात संपन्न झाले.

प्रारंभी कारखान्याचे पर्यावरण अधिकारी सचिन शिंदे यांच्या शुभहस्ते सपत्नीक सत्यनारायण महापूजा व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक यांच्या शुभहस्ते अग्निप्रदीपन करण्यात आले.

यावेळी बोलताना संस्थापक चेअरमन उमेश परिचारक म्हणाले की, आपल्या कारखान्याचा हा तेरावा गळीत हंगाम असून मागील बारा हंगामात युटोपियनने भरीव कामगिरी केली आहे. चालू गळीत हंगामात 4.00 लाख मे. टन ऊसाच्या गाळपाचे उद्दीष्ट असुन 1.00 कोटी लिटर इथेनॉल उत्पादित करणार असलेचा मानस व्यक्त केला. शासनाने दिनांक 15 ऑक्टोंबर, 2026 पासुन गाळप परवाना दिलेला आहे त्यामुळे चांगल्या रिकव्हरीचा ऊस मिळेल. पहिल्या दिवसापासुन कारखाना पुर्ण क्षमतेने चालवला जाईल. गत बाराही हंगामात ऊस उत्पादक हे युटोपियन कारखान्यास ऊस देण्यास प्राधान्य देतात व यापुढे हे देतील अशी खात्री आहे. तसेच सध्याची दुष्काळी परिस्थिती पाहता त्यांनी ऊस उत्पादक शेतकरी, कामगार वर्ग यांना पाणी काटकसरीने वापरण्यासंदर्भात आवाहन केले. ऊस उत्पादकांनी चिंता न करता कारखान्याच्या शेती विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन ही परिचारक यांनी केले. कारखान्याने या वर्षी 10 हार्वेस्टर मशिन तसेच 250 ट्रॅक्टर, 150 मिनी ट्रॅक्टर याप्रमाणे करार केले आहेत.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक म्हणाले की, संपूर्ण ऊसाचे गाळप करण्यासाठी कारखाना यंत्रणा सज्ज आहे. ऊस उत्पादक शेतकरी, कारखाना कर्मचारी यांना दिवाळी सणासाठी दरवर्षी प्रमाणे सवलतीच्या दरात साखर वाटप करणेत येईल. सर्व कामगार वर्ग हा चालू गळीत हंगाम यशस्वी करतील अशी खात्री त्यांनी व्यक्त केली. सर्व कामगारांची दिवाळी गोड व्हावी यासाठी कामगारांना दरवर्षीप्रमाणे याही वर्षी 8.33 टक्के बोनस दिला जाईल. या कार्यक्रमासाठी कारखान्याचे ऊस उत्पादक शेतकरी, खातेप्रमुख व कामगार मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ई.डी.पी मॅनेजर अभिजीत यादव यांनी मानले.

# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा हैदराबाद येथे अभ्यास दौरा




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांचा हैदराबाद येथे अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. या अभ्यास दौऱ्यात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मिलेट रिसर्च, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ऑईलसिड रिसर्च, नॅशनल ब्यूरो ऑफ प्लॅंट जेनेटिक रिसर्च आदी राष्ट्रीय संशोधन संस्थांना भेट दिली.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ऑईलसिड रिसर्च येथे वरिष्ठ संशोधक डॉ. कादिरवेल पालचमी यांनी विद्यार्थ्यांना विविध तेलबियांविषयी (सूर्यफूल, जवस, एरंड, करडई) व त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाविषयी माहिती सांगितली. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ऑईलसिड रिसर्च येथे विद्यार्थ्यांनी कृषीजैवतंत्रज्ञान विभाग, वनस्पती ऊती संवर्धन विभाग, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग आदी विभागांना भेट देऊन तेथील प्रगत तंत्रज्ञानाची माहिती घेतली.

यासोबत विद्यार्थ्यांनी न्यूट्रीहब नावाच्या व्यवसाय विकास सेवा प्रकल्पाची माहिती जाणून घेतली. यासाठी वरिष्ठ संशोधक डॉ. शुभांकर कुमार यांनी मार्गदर्शन केले. या भेटीत विद्यार्थ्यांनी विविध शास्त्रज्ञांसोबत संवाद साधून बायोफोर्टिफिकेशन, मॉलिक्युलर मार्कर टेक्नॉलॉजी, ट्रान्स्जेनेसिस यासारख्या विविध पद्धतीने पिकांच्या जाती कशा निर्माण केल्या जातात, याची माहिती जाणून घेतली.

या भेटीत विद्यार्थ्यांनी बिर्ला मंदिर, गोळकोंडा किल्ला, नेहरू झूलॉजिकल पार्क, चारमिनार, लुंबिनी पार्क आदी पर्यटनस्थळांना भेट दिली. या सहलीसाठी प्रा. सायली बडेकर यांचा सहभाग होता.

# टेंभुर्णीत मोबाईल शॉपीतून ९४ हजार ९९९ रुपयांचा मोबाईल चोरीला

## तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी येथील अकलूज रोडवरील एस. एस. मोबाईल शॉपीमधून ९४ हजार ९९९ रुपये किमतीचा विवो कंपनीचा मोबाईल चोरीला गेल्याची घटना ७ ऑक्टोबर रोजी दुपारी घडली. याप्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध १२ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेली सविस्तर माहिती अशी की, शंकेश संतोष ओहोळ (वय २४, रा. आंबेडकर नगर, मोडनिंब, ता. माढा) यांची टेंभुर्णी येथील अकलूज रोडवर एस. एस. मोबाईल शॉपी आहे. दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजून १४ मिनिटांच्या सुमारास शनिश्वर साळुंखे (रा. परीते, ता. माढा), प्रदीप धोत्रे (रा. घोटी, ता. माढा) आणि नामदेव मोरे (रा. परीते, ता. माढा) यांनी फियार्दीच्या संमतीशिवाय लबाडीच्या उद्देशाने विवो कंपनीचा एक्स ३०० एफई, १२/२५६ जीबी क्षमतेचा ९४ हजार ९९९ रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याचे फियार्दीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी शंकेश ओहोळ यांनी दिलेल्या फियार्दीवरून टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ७६५/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोलीस उपनिरीक्षक भीमराव गोळे यांनी केली असून, पुढील तपास पोलीस नाईक सोमनाथ गायकवाड करीत आहेत.

# 31 ऑगस्ट 2027 पर्यंत पिण्याच्या पाण्याचे नियोजन; जलसाठ्याच्या वापरावर निर्बंध

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** अल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमानात घट झाल्याने सन 2026 च्या खरीप हंगामातील ट्रिगर-1 (प्रथम कळ) लागू झालेल्या राज्यातील 265 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील सर्व 11 तालुक्यांचा समावेश आहे. अल निनोचा प्रभाव पुढील वर्षापर्यंत राहण्याची शक्यता लक्षात घेऊन उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर व नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्यासाठी जलसंपदा विभागाने 5 ऑक्टोबर 2026 रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. या शासन निर्णयाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन करून पिण्याच्या पाण्याची गरज सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले आहेत.

शासन निर्णयानुसार, 31 ऑगस्ट 2027 पर्यंत पिण्याच्या पाण्याची गरज सुरक्षित ठेवण्यासाठी धरणनिहाय व वापरनिहाय जलसाठ्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात येणार आहे. जलसाठ्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार असून, आवश्यक पिण्याचे पाणी, बाष्पीभवन आणि धरणातील गाळ आदी बाबी विचारात घेऊन पाण्याचे आरक्षण करण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येक प्रमुख जलाशयातील उपलब्ध जिवंत पाणीसाठ्यापैकी किमान 10 टक्के साठा बफर म्हणून राखीव ठेवण्यात येणार आहे.

पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यासाठी सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती, ग्रामपंचायती आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाणीगळती रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. तसेच 16 ऑक्टोबर 2026 पासून पाणीवापरामध्ये 10 टक्के कपात करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी प्रक्रिया केंद्रांचा पूर्ण क्षमतेने वापर करून प्रक्रिया केलेले पाणी पिण्याव्यतिरिक्त अन्य योग्य कामांसाठी प्राधान्याने वापरावे. गाव तलाव, साठवण तलाव आणि स्थानिक जलसाठे पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्याचेही निर्देश आहेत.

### औद्योगिक क्षेत्रात पाण्याच्या पुनर्वापरावर भर

औद्योगिक क्षेत्रातील प्रत्येक उद्योगाने आपल्या एकूण पाणीवापरापैकी किमान 30 टक्के पाण्याचा पुनर्वापर किंवा पुनर्चक्रण करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित कराव्यात, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

### सिंचनासाठी पाणीवापराचा प्राधान्यक्रम निश्चित

सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देताना पिण्याचे पाणी, जनावरांसाठीची पाण्याची गरज आणि औद्योगिक वापरासाठी आवश्यक पाणीसाठ्याची तरतूद केल्यानंतर शिल्लक राहणाऱ्या पाण्याचा वापर प्राधान्याने कमी पाणी लागणाऱ्या रब्बी हंगामातील पिकांसाठी तसेच अधिक चारा देणाऱ्या भूसार पिकांसाठी करण्याचे निर्देश आहेत. त्यानंतर अन्य रब्बी हंगामी पिकांचा विचार करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी पाणी बचत करणाऱ्या सिंचन पद्धतींचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

धरणे, कालवे, नद्या, तलाव आणि इतर जलस्रोतांमधून होणारा अनधिकृत व बेकायदेशीर पाणीउपसा तातडीने थांबविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या निर्देशानुसार जलसंपदा विभाग, कृषी विभाग, उद्योग विभाग, नगरविकास विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग तसेच स्थानिक स्वराज्य संस्था समन्वयाने कार्यवाही करणार आहेत. संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करावा आणि पाणी बचतीसाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# बाजार आवाराबाहेर फळे-भाजीपाला खरेदीसाठी परवानाच बंधनकारक

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** शेतकऱ्यांकडून बाजार आवाराबाहेर होणाऱ्या फळे, भाजीपाला, आले, लसूण, धणे आणि मिरची या शेतमालाच्या विनापरवाना खरेदी-विक्रीला आळा घालण्यासाठी राज्याचे पणन संचालक संजय कदम यांनी दि. 30 सप्टेंबर 2026 रोजी महत्त्वाचे परिपत्रक जारी केले आहे.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम 1963 व नियम 1967 नुसार शेतमाल उत्पादकांची फसवणूक होऊ नये आणि खरेदीदाराला एकत्रित माल मिळून प्रतवारी ठरवणे सोईचे व्हावे यासाठी नियंत्रित बाजार क्षेत्र स्थापन करण्यात आले आहेत. या कायद्यांतर्गत खाजगी बाजार, थेट पणन परवाना, एकल बाजार परवाना, शेतकरी-ग्राहक बाजार असे पर्याय निर्माण करण्यात आले आहेत.

**परिपत्रकातील ठळक मुद्दे :**

1) दि. 31/12/2025 च्या शासन राजपत्रान्वये अधिनियमाच्या कलम 6 मध्ये पोट-कलम (2अ) मध्ये सुधारणा झाली आहे. त्यानुसार "कलम 5(ड) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे लायसन अथवा परवानगी आवश्यक असेल, मात्र अशा परवानाधारकाकडून बाजार समितीला कोणतेही बाजार शुल्क (सेस) आकारता येणार नाही" अशी तरतूद समाविष्ट करण्यात आली आहे.

2) असे असतानाही काही व्यापारी या कार्यालयाकडून किंवा बाजार समित्यांकडून कोणतीही वैध अनुज्ञप्ती / परवाना न घेता बाजार आवाराबाहेर थेट शेतकऱ्यांकडून फळे व भाजीपाला खरेदी करीत असल्याच्या आणि बाजार समिती व खाजगी बाजारात लिलावाशिवाय खरेदी होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

**पणन संचालकांनी दिलेल्या सूचना :**

परवानाच बंधनकारक - या कार्यालयामार्फत देण्यात येणारे खाजगी बाजार परवाना, थेट पणन परवाना, एकल बाजार परवाना आणि बाजार समितीमार्फत देण्यात येणारा व्यापारी अनुज्ञप्ती / खरेदीदार परवाना धारण करणाऱ्या व्यापाऱ्यांनाच अधिसूचित शेतमालाची खरेदी करता येईल.

नियमनमुक्त मालालाही परवाना लागणार - कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजार आवाराबाहेर फळे आणि भाजीपाला व नोंदीत मसाले - (2- आले), (3- लसूण), (4- धणे) आणि (5- मिरची) हा शेतमाल नियमनमुक्त करण्यात आला आहे. तरीही तो अधिसूचित शेतमाल असल्याने त्याची बाजार आवाराबाहेरील खरेदी संबंधित बाजार समितीकडील व्यापारी अनुज्ञप्ती व थेट पणन परवाना, खाजगी बाजार परवाना, एकल बाजार परवाना धारण करणाऱ्यांनाच करता येईल.

विनापरवाना व्यवहारावर कारवाई - बाजार समित्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या विनापरवाना खरेदी-विक्रीला आळा घालण्यासाठी अधिनियमातील कलम 46 आणि कलम 52 नुसार असलेल्या अधिकारानुसार कारवाई करावी.

बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही परिस्थितीत अधिसूचित कृषी उत्पन्नाची विनापरवाना व्यापार होणार नाही याची दक्षता घ्यावी. आले, लसूण, धणे, मिरची या नियमनमुक्त शेतमालावर बाजार फी बसविता येणार नाही. विक्रीस आणलेल्या शेतमालाचे नाव, वजन, बाजारभाव व शेतकऱ्यास द्यावयाची रक्कम याचा तपशील असलेली पावती देणे प्रत्येक व्यापाऱ्यावर बंधनकारक राहील. शेतकऱ्यांनी परवाना नसलेल्या व्यापाऱ्यास माल विकू नये यासाठी जनजागृती करावी.

## जाहिर प्रसिध्दीकरण

क्रि.कि.अर्ज नं. १७५/२०२६

**मोहोळ येथील मे. ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट वर्ग-१ सो, यांचे कोर्टात**

तुकाराम बाबा मांडवे,
वय- ५५ वर्षे,धंदा- शेती,
रा. मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूध्द**

मुख्याधिकारी,
मोहोळ नगरपरिषद, मोहोळ,
ता. मोहोळ, जि. सोलापूर. } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांची आई नर्मदा बाबा मांडवे यांचा दि. २६/०१/१९७५ रोजी मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे मृत्यु झाला असलेने अर्जदार हा त्यांचा मुलगा असुन अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे आई नर्मदा बाबा मांडवे यांच्या मृत्यु दाखल्याची ता.२६/९/२०२६ रोजी मागणी केलेली होती, परंतु सदर मुख्याधिकारी, मोहोळ नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांनी त्यांच्या अभिलेखात १९७५ सालचे संपुर्ण अभिलेख तपासले असता अर्जदाराची आई नर्मदा बाबा मांडवे यांच्या मृत्युची नोंद नमुद नसल्याचे दिसुन आलेले असुन त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात मोहोळ नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ चे मृत्यु रजिस्टरला नोंद घेवुन अर्जदार यांना तसे मृत्यु प्रमाणपत्र देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करणेबाबत अर्ज केला आहे. याबाबत कोणाची हरकत, आक्षेप असल्यास २४/११/२०२६ रोजी समक्ष अथव वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावेत. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे मृत्युचा दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता. १३/१०/२०२६

सही/-
लिपीक (शिक्का) सही/- अधिक्षक,
मोहोळ येथील मे. ज्यु. मॅ. वर्ग-१मोहोळ

# रेणुका माता मंदिरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम

## गरबा-दांडिया उत्सवाची जय्यत तयारी



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते येथील कोटातील आई म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री रेणुका माता मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच

नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या गरबा-दांडिया उत्सवाची जय्यत तयारी पूर्ण झाली आहे.दिनांक ११ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत हा नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असून, महिला भगिनींसाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत ..

नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी रविवारी, ११ ऑक्टोबर रोजी घटस्थापनेने उत्सवाचा प्रारंभ झाला. त्यानंतर दररोज सायंकाळी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये दांडिया, कुंकुमार्चन, होम मिनिस्टर, जागर स्त्रीशक्तीचा आदी कार्यक्रमांचा समावेश आहे. प्रत्येक दिवसासाठी विशिष्ट रंगाची संकल्पना निश्चित करण्यात आली असून, त्या रंगानुसार महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

'खेळ रंगला नवरात्रीचा' गरबा-दांडिया उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी सौभाग्यवती दीपाली शत्रुघ्न गायकवाड-राऊत यांची प्रमुख उपस्थिती लाभली. नवरात्रोत्सवाच्या उत्साहात महिला भगिनींना सहभागी होता यावे, तसेच पारंपरिक गरबा आणि दांडियाच्या माध्यमातून आनंद, उत्साह आणि सांस्कृतिक एकात्मतेचा अनुभव घेता यावा, हा या कार्यक्रमामागील उद्देश आहे.गरबा-दांडिया हा नवरात्रोत्सवातील महिलांच्या उत्साहाचा आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांना एकत्र येण्याची, आपल्या कलागुणांना वाव देण्याची आणि भक्तिमय वातावरणात आनंद साजरा करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.या सर्व कार्यक्रमांमुळे नवरात्रोत्सवात धार्मिक वातावरणाबरोबरच महिला सक्षमीकरण, सांस्कृतिक जतन आणि सामाजिक एकोपा यांना प्रोत्साहन मिळणार आहे. त्यामुळे सदर होणाऱ्या सर्व कार्यक्रमास महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक समिती व रेणुका परिवार, नातेपुते यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**नवरात्र उत्सवानिमित्त होणारे विविध कार्यक्रम**

बुधवार, १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ८ वाजता दांडिया, गुरुवार, १५ ऑक्टोबर रोजी कुंकुमार्चन, शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी होम मिनिस्टर, शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी दांडिया, तर रविवार, १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ८ वाजता 'जागर स्त्रीशक्तीचा' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**

**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**

**संपर्क - 9422602337, 8317212037**

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) महाराष्ट्राचे एक उपमुख्यमंत्री २) कविता, काव्य ३) खोदलेले खंदक ४) कमजोर ५) भारतीय क्रिकेट संघाचा एक माजी कर्णधार ६) व्रण, ओळ (ग्रामीण भाषेत) ११) दुर्दशा, वाईट स्थिती, **अपेष्टा १२) उणीव, टंचाई १३) उजाड, ओसाड १५) काकाची पत्नी १७) कष्ट, परिश्रम १९) वतनाचा मालक २०) शिक्षा २२) एक म्हण-उथळ पाण्याला खळखळाट **२४) महाराष्ट्राचा पूर्व-दक्षिण जिल्ह्यांचा भाग २५) दोन मिनिटात तयार होणारी, लहान मुलांच्या आवडीचा पदार्थ ज्याच्यावर सरकारने बंदी आणली होती २७) दु:ख (हिंदीत) २९) मराठी वर्षातील अकरावा महिना ३०) विक्रम गोखले, दिलीप प्रभावळकर अभिनीत राजकारणावरील चित्रपट ३१) विदेशी मद्य ३२) श्रीकृष्णाचा भाऊ ३३) बोलावणे, हाक ३७) लोकसभा सदस्य ३९) राष्ट्रवादीचे एक नेते-छगन **** ४२) संशय हिंदीत) ४३) जपानी जाड पैलवान ४५) विषमच्या विरूध्दार्थी ४७) होता जिवा म्हणून वाचला ** ४८) फटाक्याची माळ, शिक्षकांना या नावाने संबोधतात

**आडवे शब्द :** १) कॉंग्रेस पक्षाचे एक नेते ४) आ. नितेश राणे यांचा मतदारसंघ ७) नवरा मुलगा, आशिर्वाद ८) सीतापती ९) एक म्हण-सुंभ जळाला तरी ** जळत नाही १०) पाणी पिण्याची तीव्र इच्छा, तृष्णा १२) भवा उलट लिहा १४) आयपीएलमधील एक अष्टपैलू खेळाडू-*** पंड्या १६) क्षण (हिंदीत) १७) स्वर्गातील एक अप्सरा १८) श्रीकृष्णाची आई २०) संगत, सोबत २१) दोघांमधील अंतर, फरक २३) मुस्लिम बांधवांचा एक पवित्र सण २६) गन उलट लिहा २८) तमाशातील कलावंत ३२) सुक्या मेव्यातील एक पौष्टीक घटक ३३) बारा गुणिले पाच ३४) वास्तू, निवास ३५) थंडीमध्ये गळ्याभोवती गुंडाळतात ३६) रूग्णालय ३८) चुलत्यांना वा मावशीच्या पतीस या नावाने संबोधतात ४०) मच्छर ४१) बे दुणे ४२) लाज ४४) गुलाम ४६) समीर भुजबळ या जिल्ह्यातील आहेत ४८) सर्व (हिंदीत) ४९) मुस्लिम बांधवांचा एक सण ५०) गुटख्याप्रमाणे एक अंमली पदार्थ ५१) भारतातील दक्षिणेकडील एक राज्य

## सुडोकु - 76

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | 8 | 5 | | | | 3 |
| | | | | 3 | 4 | | | |
| 6 | 8 | 3 | | | 9 | | 5 | 4 |
| | 4 | | | | | 7 | 2 | |
| | | 6 | 3 | 4 | | | 9 | |
| | | 1 | 6 | | 2 | | | 5 |
| | | | | 6 | 8 | 4 | | 9 |
| | | 8 | | | 3 | 1 | | 2 |
| 7 | | 4 | | 2 | 1 | 5 | 3 | 8 |

# एक सही संतापाची !

## मतदारांच्या संतापाला मनसेचा आवाज

## बॅलेट पेपरसाठी सोलापूरात सह्यांची मोहीम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि मतदारांचा विश्वास कायम राखण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सोमवारी (दि. १२ ऑक्टोबर) सोलापुरातील सोन्या मारुती चौक येथील मनसे कार्यालयात सह्यांची मोहीम राबविण्यात आली. 'एक सही संतापाची, एक सही लोकशाही वाचविण्यासाठी!' या घोषवाक्याखाली राबविण्यात आलेल्या या मोहिमेत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासह मतदानासाठी ईव्हीएमऐवजी मतपत्रिकांचा वापर करण्याची मागणी करण्यात आली.

या मोहिमेद्वारे एसआयआर प्रक्रिया रद्द करावी, स्वच्छ व निष्पक्ष मतदार याद्या तयार कराव्यात आणि निवडणूक प्रक्रिया राबवताना सर्व राजकीय पक्षांना विश्वासात घ्यावे, अशा प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या. निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता आणि पारदर्शकतेबाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांवर संबंधित यंत्रणांनी स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

**लोकशाही मार्गाने लढा सुरू ठेवणार**

निवडणूक ही लोकशाहीचा आत्मा असून मतदारांचा विश्वास टिकविण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे. निवडणूक प्रक्रियेबाबत नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या शंका दूर करण्यासाठी पारदर्शक व्यवस्था आवश्यक आहे. जनतेच्या भावना आणि मागण्या संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचविण्यासाठी ही मोहीम आयोजित केल्याचे मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. मतदारांच्या प्रश्नांना उत्तरे मिळाली पाहिजेत आणि निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास कायम राहिला पाहिजे, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या मोहिमेत मनसेसह शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारीही




सहभागी झाले होते.

यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, प्रशांत गिड्डे, शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख, शिवसेनेचे महानगरप्रमुख महेश धाराशिवकर, मनविसे जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे, शिवसेनेचे सत्तार सय्यद, वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद कुमठेकर, जिल्हा उपाध्यक्ष निलेश भंडारे, वाहतूक सेनेचे शहराध्यक्ष जितेंद्र टेंभुर्णीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजू कुरेशी, शेरू कुरेशी, मनसे महिला आघाडीच्या शहराध्यक्ष जयश्री हिरेमठ, शोभाताई साठे, शहर उपाध्यक्ष अनिल भिसे, गणेश पाटील, आकाश निंबाळकर, अनिकेत उपासे, गणेश भोसले, समर्थ ओझा, द्वारकेश पटणे, अभिषेक इरकल, वैभव धोत्रे, सैफन जमखंडी, गोविंद बंदपट्टे, सोपान महिंद्रकर, आकाश राठोड, शफीक शेख आणि विनायक माढेकर यांच्यासह मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुष्काळग्रस्त कुटुंबांना आधार देण्यासाठी सामुदायिक विवाह सोहळा होणार

## प्रा. शिवाजीराव सावंत यांची-सन्मान सोहळ्यात घोषणा

**माढा (कटूसत्य वृत्त):-** यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी कुटुंबांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. या परिस्थितीत गरजू कुटुंबांना आर्थिक हातभार लावण्याच्या उद्देशाने जयवंतराव सावंत प्रतिष्ठानच्या वतीने काही वर्षांपासून खंडित झालेला सामुदायिक विवाह सोहळा यंदा पुन्हा आयोजित करण्यात येणार आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य शेतकरी गोरगरिब कुटुंबांना दिलासा देण्याचा प्रतिष्ठानचा प्रयत्न असल्याची माहिती प्रा. शिवाजीराव सावंत यांनी दिली. प्रा. शिवाजीराव सावंत यांच्या वाकाव येथील सन्मान सोहळ्या प्रसंगी ते बोलत होते.

प्रा.सावंत पुढे बोलताना म्हणाले, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीचा ग्रामीण भागातील जनजीवनावर परिणाम झाला असून, शेती आणि शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना आर्थिक संकटाचा सामना करावा



लागत आहे. अशा परिस्थितीत कुटुंबातील विवाह समारंभ पार पाडताना मोठा खर्च करणे अनेकांना अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे गरजू कुटुंबांना मदत व्हावी आणि त्यांच्या आर्थिक बाबतीत काही प्रमाणात हातभार लागावा, या उद्देशाने सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्याचा निर्णय घेतल्याचे सावंत यांनी सांगितले. समाजातील गरजू घटकांना मदत करणे आणि अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे ही सामाजिक जबाबदारी आहे. याच भावनेतून जयवंतराव सावंत प्रतिष्ठानच्या वतीने खंडित झालेला सामुदायिक विवाह सोहळा पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे प्रा. सावंत यांनी स्पष्ट केले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रा.शिवाजीराव सावंत यांच्या सन्मानार्थ सत्कार करण्यात आले.

**वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव**

दरम्यान, प्रा. शिवाजीराव सावंत यांचा वाढदिवस वाकाव येथील त्यांच्या निवासस्थानी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते, मित्रपरिवार तसेच हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी प्रा. सावंत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या. वाढदिवसानिमित्त झालेल्या या कार्यक्रमात सामुदायिक विवाह सोहळ्याची घोषणा करण्यात आल्याने सामाजिक उपक्रमातून गरजू कुटुंबांना मदत करण्याच्या प्रतिष्ठानच्या प्रयत्नांची माहिती उपस्थितांना मिळाली....

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात शंकर उवाच 'रामायण' सजीव हलता देखाव्याचे शानदार उद्घाटन

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या परिसरात असलेल्या श्री तुळजाभवानी माता मंदिर येथे श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव -२०२६ चे आयोजन करण्यात आले असून, रविवार सायंकाळी शंकर उवाच 'रामायण' सजीव हलता देखाव्याचे शानदार उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

दरम्यान श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली मंडळाने यंदाही न्यासाच्या परिसरात असलेल्या श्री तुळजाभवानी माता मंदिर येथे श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव -२०२६ चे आयोजन करण्यात आले असून, रविवार दि. ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वा. शंकर उवाच 'रामायण' सजीव हलता देखाव्याचे शानदार उद्घाटन सोहळा आमदार सचिन कल्याणशेट्टी व नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते व मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली आणि प.पु.वे.शा. सं.श्री.मोहन गोविंदराव पुजारी मुख्य पुरोहित श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान यांच्या दिव्य सानिध्यात व अक्कलकोट नगरपरिषदेचे सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. आई राजा उदो उदो...! सदानंदाचा उदो उदो...!, अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त...! श्री स्वामी समर्थ महाराज कि, जय...! च्या जय घोषाने परिसर दुमदुमून गेला होता.

श्री तुळजाभवानी माता मंदिरात महापूजा, आरती मान्यवरांच्या हस्ते



करण्यात आले. सदर कार्यक्रम हा श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली प.पु.वे.शा. सं. श्री.मोहन गोविंदराव पुजारी मुख्य पुरोहित श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान यांच्या दिव्य सानिध्यात तर श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष व जेष्ठ नगरसेवक महेश इंगळे, उपनगराध्यक्ष ऋतूराज उर्फ बंटी राठोड, प्रथमेश इंगळे,हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, नगरसेवक भीमराव तथा तम्मा शेळके, माजी नगरसेवक सुनिल सिद्धे,न.प. आरोग्य सभापती- अविनाश मडीखांबे, गट नेते- यशवंत तात्या धोंगडे, महेश हिंडोळे,नागराज कुंभार, श्रीमती कस्तुराबाई चौगुले, लक्ष्मीकांत धनशेट्टी, रमेश कापसे, शिक्षण सभापती- अपणार्ताई सिद्धे, नाविद डांगे, अमृताताई शिंदे, शैलाताई स्वामी, स्नेहाताई खवळे, सद्दामहुसेन शेरीकर, सोनालीताई शिंदे, पाणी पुरवठा सभापती- देविदास कवटगी, सुनंदाताई स्वामी, मंजनाताई कामनुरकर, नन्नु कोरबू, सरिताताई कुरले, प्रवीण शहा, संजय घोडके, अशोक जाधव, या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी मान्यवरांचा सत्कार सोहळा संपन्न झाला.

सदर देखावा हा विजयादशमी पर्यंत सर्व देवी भक्त व शहर वाशीयांसाठी असणार आहे. तरी सर्वांनी या संधीचा लाभ घ्यावेत असे आवाहन संस्थेचे सचिव शामराव मोरे यांनी केले आहेत.

या प्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, अभिजित लोकापुरे, मनोज निकम, अरविंद शिंदे,रामचंद्रराव घाटगे, बाबुशा महिंद्रकर,बाळासाहेब शिंदे,बाळासाहेब शिंदे,नितीन शिंदे, संजय गोंडाळ, खंडेराया शिंदे, सौरभ मोरे, रोहित खोबरे, सिद्धेश्वर मोरे, किरण पाटील, शरणप्पा कापसे, निखिल पाटील, ॲड.फहिम पिरजादे, सनी सोनटक्के, भरत राजेगावकर, रोहन शिर्के, शुभम सावंत, अतिश पवार, बाळासाहेब पोळ, गोटू माने, योगेश पवार, सरफराज शेख, मैनुद्दीन कोरबू, अनिल कुर्ले, अशपाक काझी, समर्थ घाटगे,किरण साठे, यश विभूते, नामा भोसले, अप्पा हंचाटे, बाबुशा महिंद्रकर, स्वामिनाथ बाबर, सतीश महिंद्रकर, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, तानाजी पाटील, राजू पवार, महांतेश स्वामी, सिद्धराम कल्याणी, ज्ञानेश्वर भोसले, बलभीम पवार, रोहित मोरे, रवी वाघमोडे, धनंजय गाढवे, सिद्धेश्वर माळी, कुमार पाटील, विशाल कलबुर्गी,रुद्रय्या स्वामी,प्रदीप बणजगोळ, सागर गोंडाळ, श्रीशैल कुंभार, राहूल इंडे, सागर पवार,प्रीतेश किलजे, स्वामीनाथ गुरव, प्रसन्न हत्ते, विजय इंगळे, वैभव कामनुरकर, ऋषी लोणारी, स्वप्निल मोरे, चंद्रकांत कुंभार, प्रसाद मोरे, अमर मसरे, प्रकाश माने, धानप्पा उमदी, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, विशाल घाटगे यांच्यासह या कार्यक्रमास समस्त विश्वस्त मंडळ, क्रियाशील सदस्य, कार्यकर्ते, व सेवेकरी, अन्नछत्र मंडळाची सहयोगी, हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था, अमोलराजे लेझीम संघ, अमोलराजे भोसले मित्र परिवार आदीजन उपस्थित होते.

स्वागत व प्रास्ताविक, सूत्रसंचालन- श्वेता हुल्ले यांनी केले.

**शंकर उवाच रामायण-**

यामध्ये भगवान शंकर हे माता पार्वतीला श्रीरामचंद्रांचे मूळ आध्यात्मिक रूप आणि त्यांची कथा सांगतात.

अध्यात्मिक दृष्टिकोन: वाल्मिकी रामायणात श्रीरामांचे चित्रण प्रामुख्याने एक 'आदर्श मनुष्य' (मर्यादा पुरुषोत्तम) म्हणून केले आहे. याउलट, अध्यात्म रामायणात श्रीरामांना साक्षात परब्रह्म, विष्णूंचे पूर्ण रूप आणि सीतेना त्यांची 'योगमाया' मानून संपूर्ण कथेला आध्यात्मिक आणि वेदांत तत्त्वज्ञानाची जोड दिली आहे. 'शंकर उवाच' अर्थात अध्यात्म रामायण हा केवळ रामाची कथा सांगणारा ग्रंथ नसून, जीवाला मोक्षाचा मार्ग दाखवणारा एक महान आध्यात्मिक ग्रंथ आहे.

**सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवाणी**

यंदा अन्नछत्र मंडळाच्या गट नं. ५८१ या नवीन वाहनतळ जागेतील अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग ॲकॅडमी येथे नवरात्र महोत्सवानिमित्त अन्नछत्र मंडळ व न्यासाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर २०२६ या पाच दिवसाच्या कार्यक्रमात मंगळवार दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी शाहीर संतोष साळुंके, लातूर यांचे शाहिरी पोवाडा, बुधवार दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सावनी रविद्र व ऋषिकेश रानडे प्रस्तुत 'सूर आनंदधन' लोकप्रिय मराठी गीतांचा कार्यक्रम, गुरुवार दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी गुरु ठाकूर प्रस्तुत 'चांद हा नभातला' सुगम गीत गायन, शुक्रवार दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी गौरी दामले प्रस्तुत 'मंगेशकर मिस्ट्रो हा लता मंगेशकर यांची सुरेल गाणी आणि शनिवार दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी मिलिंद इंगळे प्रस्तुत ' गारवा- हवा हवासा' हा सुगम गीतांचा कार्यक्रम व रविवार दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी महालक्ष्मी इव्हेंट्स प्रस्तुत गान रसमंजरी संगीत संजे हणुमंत लमाणी (बिग बॉस विनर तथा झी कन्नड सारेगमप गायक हावेरी ), प्रगती बडीगेर (झी कन्नड सारेगमप सीजन १९ विजेत्या), अनन्या प्रकाश (प्रसिद्ध प्लेबॅक सिंगर बेंगळुरू) हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. वरील सर्व कार्यक्रम दि. १३ ते १८ ऑक्टोबर २०२६ च्या दरम्यान सायं. ७ ते ९.३० या कालावधीत संपन्न होणार आहेत.

# डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीत एकदिवसीय बांबू हस्तकला कार्यशाळा संपन्न

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** गोपाळपूर (ता.पंढरपूर) मधील एसीआयसी तथा अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर- स्वेरी पंढरपूर अराईज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या कौशल्य विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने स्वेरीमध्ये रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी एकदिवसीय बांबू हस्तकला कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये सकाळी १० ते सायंकाळी ०५ या वेळेत होतकरू महिलांनी सहभाग घेऊन आपल्या कलागुणांना वाव दिला. या कार्यशाळेच्या माध्यमातून होतकरू महिलांना एक प्रकारचे व्यासपीठ मिळाले असून रोजगार निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळे महिला वर्गात समाधानाचे वातावरण पसरले आहे.

संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर- स्वेरी पंढरपूर अराईज फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष भुतडा यांच्या नेतृत्वाखाली एसीआयसी तथा अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर मध्ये आयोजिलेल्या कार्यशाळेसाठी मॅग्निफिसीन्स टोटल गिफ्टिंग सोल्युशन्स एलएलपीच्या संचालिका सौ. रश्मी पोंसे व त्यांच्या टीमने सहभागी महिला प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन केले. यावेळी सहभागी ५० महिलांना बांबूपासून आकर्षक भेटवस्तू तसेच दैनंदिन वापरातील विविध उपयुक्त वस्तू तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. पारंपरिक हस्तकलेला



आधुनिक बाजारपेठेची जोड देत त्यातून उत्पन्नाच्या संधी कशा निर्माण करता येतील, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. सहभागी महिला प्रशिक्षणार्थीनी तयार केलेल्या बांगड्यांचा स्टँड आणि टी-लाईट होल्डर मॅग्निफिसीन्स टोटल गिफ्टिंग सोल्युशन्स एलएलपी यांनी विकतही घेतले. यामुळे महिलांची प्रशिक्षणामधेच विक्री करून व्यवसायाला सुरुवात ही झाली ही एक मोठी अभिमानास्पद बाब होती. कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर- स्वेरी पंढरपूर अराईज फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष भुतडा यांनी उपस्थित महिला प्रशिक्षणार्थी बरोबर संवाद साधत मार्गदर्शन केले. महिलांनी आपल्या पारंपरिक कौशल्यांचा विकास करून त्यांना व्यावसायिक स्वरूप देण्यासोबतच रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यानंतर सौ. रश्मी पोंसे व टीमनी बांबूपासून वस्तू तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितली. यामध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत बांगड्यांचा स्टँड, टी-लाईट होल्डर आणि कंदील या वस्तू स्वतः तयार केल्या. त्यामुळे प्रशिक्षणार्थीना बांबू हस्तकलेचे कौशल्य प्रत्यक्ष कृतीतून आत्मसात करण्याची संधी मिळाली. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर- स्वेरी पंढरपूर अराईज फाउंडेशनचे समुदाय संपर्क व्यवस्थापक मधुकर पकाले यांनी अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर द्वारे भविष्यात घेण्यात येणाऱ्या विविध कौशल्यविकास, उद्योजकता व रोजगाराभिमुख प्रशिक्षण उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. महिलांच्या कौशल्यांना व्यावसायिक दिशा देत त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि उद्योजक बनविण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरली. अशा उपक्रमांमुळे स्थानिक पातळीवरील पारंपरिक कौशल्यांना बाजारपेठ उपलब्ध होण्यासोबतच महिलांसाठी नव्या स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे. या कार्यशाळेत पंढरपूर पंचक्रोशीतील जवळपास ५० महिला सहभागी झाल्या होत्या. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी एसीआयसी तथा अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर मधील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# रूपाभवानी मंदिरात नवरात्र महोत्सवानिमित्त नऊ दिवस मोफत आरोग्य शिबिर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** नवरात्र महोत्सवाचे औचित्य साधून श्री रूपाभवानी देवस्थान येथे देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी नऊ दिवसांच्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. विविध सामाजिक संस्था, वैद्यकीय संघटना आणि शासकीय आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

शिबिराचे उद्घाटन सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने



आणि रूपाभवानी मंदिर समिती ट्रस्टचे अध्यक्ष मल्लिनाथ मसरे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर होते.

यावेळी बोलताना डॉ. राखी माने यांनी महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे, कर्करोगापासून संरक्षणासाठी एचपीव्ही लसीकरण आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व स्पष्ट केले. महिलांचे आरोग्य जपण्याचे काम सामाजिक संस्थांकडून होणे कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. येळेगावकर यांनीही या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले.

शिबिरात रक्तगट, हिमोग्लोबिन, रक्तशर्करा, रक्तदाब आणि एचआयव्ही तपासणी, औषधोपचार, सॅनिटरी नॅपकिन व कुटुंबनियोजन साधनांचे वाटप, माता-बालक लसीकरण तसेच प्रजनन आरोग्यविषयक मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात येणार आहे. इच्छुक रक्तदात्यांकडून रक्तसंकलनही केले जाणार आहे.

यावेळी विविध सामाजिक संस्था, वैद्यकीय संघटना आणि मंदिर प्रशासनाचे पदाधिकारी उपस्थित होते. व्यंकटेश कंची यांनी स्वागत, डॉ. नागनाथ जिद्दीमनी यांनी प्रास्ताविक, सुगतरत्न गायकवाड यांनी सूत्रसंचालन, तर डॉ. श्रुती मराठे यांनी आभार मानले.

# 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानासाठी मंगळवेढ्यात तालुकास्तरीय प्रशिक्षण

**मंगळवेढा, (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील प्रत्येक गाव आरोग्यदृष्ट्या सक्षम व संपन्न करण्याच्या उद्देशाने पंचायत समिती मंगळवेढा येथे तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने ह्यमाझे गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत तालुकास्तरीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणात विविध विभागांचे अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि आरोग्य पथकांनी सहभाग घेत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या प्रशिक्षणास जिल्हा आरोग्य अधिकारी मा. डॉ. सतीश कोपूरवाड, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी मा. डॉ. नांदकिशोर घाडगे आणि माता व बालसंगोपन अधिकारी मा. डॉ. हर्षल जाधव यांचे मार्गदर्शनाखाली तालुका आरोग्य अधिकारी मंगळवेढा मा. डॉ. भाऊसाहेब जानकर व तालुकास्तरीय प्रशिक्षकांनी अभियानाचे उद्दिष्ट, कार्यपद्धती आणि अंमलबजावणी याबाबत मार्गदर्शन करुन प्रशिक्षण घेतले.

प्रशिक्षणादरम्यान गावातील आरोग्यविषयक समस्या ओळखणे, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा बळकट करणे, आरोग्यविषयक निर्देशांकांमध्ये सुधारणा घडवून आणणे तसेच




ग्रामपंचायत, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि महिला व बालविकास विभाग यांच्या समन्वयातून गावाचा सर्वांगीण आरोग्यविकास साधणे, या बाबींवर भर देण्यात आला. अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती व आरोग्य संस्थांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची माहितीही देण्यात आली.

तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या पथकांनी अभियानाच्या अंमलबजावणीसंदर्भात गटचर्चा व कृती आराखड्यांचे सादरीकरण केले. गावपातळीवर नियोजन, आरोग्यविषयक उपक्रमांची अंमलबजावणी आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, यावर यावेळी चर्चा झाली.

या प्रशिक्षणास गटविकास अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक व सहायिका, आरोग्य सेवक व सेविका तसेच गटप्रवर्तक उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाच्या सूचनांनुसार मंगळवेढा तालुक्यात हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. तालुक्यातील सर्व पदाधिकारी, प्रतिनिधी, प्रत्येक गावातील सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी, नागरिक, तरुण मंडळे महिला बचत गट आणि शिक्षण, एकात्मिक बालविकास प्रकल्प विभाग व इतर विविध शासकीय विभागांनी सक्रिय सहभाग घेऊन गाव आरोग्य संपन्न करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन मा. डॉ. भाऊसाहेब जानकर तालुका आरोग्य अधिकारी मंगळवेढा यांनी यावेळी केले.

# प्रताप क्रीडा मंडळातर्फे १८ ऑक्टोबरला बालक्रीडा स्पर्धा

## चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सहभागाची संधी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शंकरनगर येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी बालक्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही माहिती मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते-पाटील व स्पर्धा समितीचे प्रमुख सयाजीराजे मोहिते-पाटील यांनी दिली. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाने आतापर्यंत राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा, आट्यापाट्या स्पर्धा, समूह नृत्य स्पर्धा, भव्य कुस्ती स्पर्धा, रक्तदान शिबिर व आरोग्य शिबिरे असे विविध उपक्रम





राबवले आहेत. तसेच गरजूंना दिवाळीचा सण आनंदाने साजरा करता यावा, यासाठी 'रत्नाई' मिठाई हा उपक्रमही 'ना नफा ना तोटा' या तत्वावर मंडळाकडून राबवला जातो.

याच परंपरेनुसार विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल येथे ही स्पर्धा होणार असून, त्यात बालगटापासून इयत्ता चौथीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतील.

**स्पर्धेतील क्रीडा प्रकार**

- लहान गट: डोक्यावर चेंडू घेऊन पळणे (४० मी.)
- मोठा गट: धावणे (६० मी.)
- इयत्ता पहिली: कमरेवर हात ठेवून उड्या मारत जाणे (४० मी.)
- इयत्ता दुसरी: लंगडी घालत जाणे (४० मी.)
- इयत्ता तिसरी: तीन पायांची शर्यत (४० मी.)
- इयत्ता चौथी: पोत्यात पाय घालून उड्या मारत जाणे (४० मी.)

प्रत्येक गटासाठी स्वतंत्र बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेचे नियोजन सहा मैदानांवर करण्यात आले असून, ४५ पंच कामकाज पाहणार आहेत.

**नावनोंदणीसाठी संपर्क**

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी नावनोंदणीसाठी खालील व्यक्तींशी संपर्क साधावा, असे आवाहन मंडळाचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले-पाटील यांनी केले आहे:

- रमेश गायकवाड - ९८६०८७६५३५
- प्रशांत जगताप - ९६३७१७४१६७
- हनुमंत किर्दक - ९६७३०३०३१८
- प्रकाश मगर - ८७६७२४५४५३
- युवराज बनपट्टे - ९८३४७५५९१२
- इलाही बागवान - ९२७२३६५१३६

यावेळी मंडळाचे सचिव बिभीषण जाधव, स्पर्धाप्रमुख शिवाजी पारसे, भानुदास आसबे, संजय राऊत, अर्जुन बनसोडे, सर्व सदस्य व क्रीडा प्रशिक्षक उपस्थित होते.